VENKATESH MAHAJAN SR. COLLEGE OFFICE ★ OSMANABAD ★

28/04/2023
शुक्रवार

# शेतकरी मित्र केंद्र - कार्यपूर्ती अहवाल
## शै. वर्ष 2022-23

रचना :- 01 जून 2020 रोजी महाविद्यालयात शेतकरी मित्र केंद्राची स्थापना करण्यात आली. शै. वर्ष 2022-23 मध्ये केंद्राच्या कार्यपूर्तीची रचना खालील प्रमाणे आहे.

1] प्रा. अशोक रा. गोरे - समाजशास्त्र विभाग प्रमुख - केंद्र समन्वयक
2] प्रा. रवी कुलकर्णी - इतिहास विभाग - केंद्र सहाय्यक समन्वयक
3] प्रा. डॉ. सौ. जयश्री कुलकर्णी - इतिहास विभाग प्रमुख - सदस्य
4] प्रा. डॉ. प्रमोद बेरळीकर - अर्थशास्त्र विभाग प्रमुख - सदस्य
5] प्रा. दिनकर रासवे - राज्यशास्त्र विभाग प्रमुख - सदस्य
6] प्रा. डॉ. मकरंद चौधरी - राष्ट्रीय सेवायोजना विभाग प्रतिनिधी

▪ सामंजस्य करार

दि. 31 मे. 2022 रोजी प्रा. अनिल व्याल यांच्या राष्ट्रीय सर्वांगिण ग्रामिण विकास संस्था, मुळशी जि. पुणे या संस्थेशी महाविद्यालयाच्या शेतकरी मित्र केंद्राशी सामंजस्य करार करण्यात आला.

▪ 'सेंद्रिय शेती' विषयावर कार्यशाळा

दि. 10/08/2022 रोजी शेतकरी मित्र केंद्राच्या वतीने महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत मा. शशिकांत गव्हाणे यांचे 'सेंद्रिय शेती' विषयावर मार्गदर्शन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. शेषाद्रि डांगे (आन्न) हे होते. तसेच श्री धनाजी धोतरकर यांचे ही मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आभार डॉ. मकरंद चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाला एकुण 52 विद्यार्थी उपस्थित होते.

▪ 'गो-आधारित सेंद्रिय शेती' विषयावर कार्यशाळा

दि. 15/10/2022 रोजी 'गो-आधारित सेंद्रियशेती' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत प्रा. श्री. अनिल व्याल यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री कमलाकर पाटील हे होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी केले. कार्यशाळेत प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव कथन झाले. कार्यक्रमाला शेतकरी, प्राध्यापक, पालक यांचे सह एकुण 24 विद्यार्थी सहभागी होते.

(signature)
PRINCIPAL
Venkatesh Mahajan Sr.College
Osmanabad

आपला
(signature)
प्रा. अशोक रामचंद्र गोरे
समन्वयक
शेतकरी मित्र केंद्र